# महत्त्वाचे

## चापडगाव नदीवरील बंधारे तातडीने भरून देण्याची मागणी



**शेवगाव (शहर प्रतिनिधी) –** ताजनापूर उपसा सिंचन योजनेतून चापडगाव व परिसरातील नदीवरील बंधारे तातडीने भरून द्यावेत अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी खासदार निलेश लंके यांच्याकडे बोधेगाव येथे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे, ताजनापुर सिंचन योजनेचे काम संथगतीने सुरू आहे. मागील वर्षी दोन वेळेस चापडगाव नदीवरील बंधाऱ्यांमध्ये ताजनापुर लिफ्टचे पाणी सोडल्याने परिसरातील अनेक विहिरींना व शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ मिळाला. यंदा पुन्हा चापडगाव नदीवरील बंधारे पूर्ण क्षमतेने भरून द्यावेत, असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष गायकवाड, सरपंच शहादेव पातकळ, राजु पातकळ, ग्रां.प.सदस्य निलेश गायकवाड, सुभाष लोहकरे, अशोक गायकवाड, शहाजी जाधव, भागवत पातकळ, बाळासाहेब पातकळ, मनोजकुमार नेमाने, कृष्णा जगताप आदींसह शेतकरी उपस्थित होते.

## सर्वांगीण विकासासाठी मैदानी खेळ महत्त्वाचे : डॉ. बडे



**शेवगाव (तालुका प्रतिनिधी) –** सर्वांगीण विकासामध्ये अभ्यासाबरोबरच मैदानी खेळही महत्त्वाची भूमिका बजावतात, तसेच शालेय जीवनात स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकाराव्यात, जंक फूड, मोबाईलपासून दूर रहावे असे प्रतिपादन डॉ. सुनील बडे यांनी केले. येथील निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये (सीबीएसई) वार्षिक क्रीडा महोत्सवाचा प्रसंगी पाहुणे म्हणून हृदयरोगतज्ञ डॉ. सुनिल बडे बोलत होते. अध्यक्षस्थानी सहाय्यक पोलीस निरीक्षक धरमसिंग सुंदर्डे होते. डॉ. बडे, सुंदर्डे व प्राचार्य अविराज काळे, यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून तसेच हवेत फुगे सोडून क्रीडा महोत्सवास प्रारंभ करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात धरमसिंग सुंदर्डे यांनी आपल्या जीवनातील खेळाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देताना सांघिक भावना, अचुकता, चपळता, एकाग्रता कशी वाढीस लागते हे स्पष्ट केले. प्राचार्य अविराज काळे यांनी खेळाडू वृत्ती जोपासण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमासाठी क्रीडा शिक्षक आशिष मेहत्रे, मुख्य समन्वयक प्रा. सुनील आढाव यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल पवार यांनी केले. बाळू निळ यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. आभार रुपाली शेटे यांनी मानले.

## १८ जानेवारीला पारनेर मॅरेथॉन स्पर्धा

**पारनेर (तालुका प्रतिनिधी) –** येथील नागेश्वर मित्र मंडळाच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय पारनेर मॅरेथॉन स्पर्धा येत्या १८ जानेवारी ला आयोजीत केल्याची माहिती मंडळाचे प्रमुख क्रीडा मार्गदर्शक भिकाजी जगदाळे, दिगंबर शिंदे, वैभव पठारे, गणेश डेरे, वैभव बडवे, नजीर तांबोळी यांनी दिली. स्पर्धेचे यंदा २३ वे वर्ष आहे. नागेश्वर मित्र मंडळाचे वतीने स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी पारनेर मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. १८ जानेवारीला पारनेर बाजारतळ येथून स्पर्धेस प्रारंभ होणार आहे. खुल्या गटात (पुरूष) राज्यातील स्पर्धकांना प्रवेश दिला जाणार आहे. पहीली ते चौथी मुले, मुली, पाचवी ते सातवी मुले-मुली आठवी ते दहावी मुले-मुली असे गट आहेत. शालेय गटात फक्त पारनेर तालुक्यातील स्पर्धकांना प्रवेश दिला जाणार असल्याचे अध्यक्ष राजेंद्र म्हस्के, कल्याण थोरात, गणेश कावरे, अश्विन कोल्हे, धीरज महांडुळे यांनी सांगितले. स्पर्धेसाठी १२ जानेवारीपर्यंत नावनोंदणी करण्याचे आवाहन नागेश्वर मित्र मंडळाच्यावतीने करण्यात आले. पारनेर स्पर्धेतील विजेत्यांना अण्णा हजारे यांच्या निवृत्तीवेतनातून दरवर्षी ट्राफी देण्यात येते.

# जुन्या वादातून नगरमध्ये युवकावर भररस्त्यात खुनी हल्ला

## चाकूने केले वार; आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी) –** जुन्या वादाचा मनात राग धरून आठ जणांनी युवकाला शिवीगाळ दमदाटी करुन चाकूने वार करून, त्याच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना नगर पुणे रोड वरील इम्पिरियल चौकाजवळील एस एस मोबाईल शॉपी जवळ शुक्रवारी (दि.३) रात्री १०.३० च्या सुमारास घडली. या घटनेने त्या परिसरात पळापळ झाली. व्यावसायिकांनी आपली दुकाने पटापट बंद करून घेतली. विशाल राजेंद्र भंडारी (वय २३, रा. समृध्दी नगर, वाकोडी रोड) असे हल्ल्यात जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. विशाल याचे साधारण ८ ते ९ महिन्यांपूर्वी सनी शिंदे, (रा.गांधी मैदान, अ.नगर) याच्या सोबत गांधी मैदान येथे किरकोळ वाद झाले होते. ते वाद मिटवले होते. शुक्रवारी रात्री १० च्या सुमारास विशाल हा त्याच्या मोपेड वरून घरी जात असताना इम्पिरीयल चौकात सनी शिंदे याने त्यास हाक मारली, पण तो थांबला नाही. काही वेळाने विशाल हा रात्री १०.३० च्या सुमारास एस. एस. मोबाईल शॉपी, नगर पुणे रोड येथे थांबलेला असताना त्याच्या पाठीमागे तीन मोटारसायकल वरुन बंटी ऊर्फ भावेश राऊत (रा. माणिक चौक), आशिष ऊर्फ सनी शिंदे (रा. गांधी मैदान), करण फसले, रजत कडव, सचित देसले, अथर्व दिघे, करण शादिजो, उमेश निस्ताने, (सव रा.नगर) हे आले. त्यातील



बंटी राऊत शिवीगाळ करु लागला, तेव्हा विशाल त्याला म्हणाला की, तु मला शिवीगाळ का करतोस. त्यावर बंटी राऊत हा म्हणाला 'तू भाई बनू राहीला का तुझा काटा काढतो एकदाचा' असे म्हणुन त्याने शर्टची गंचाडी धरुन मागे ओढले व त्याच्यासोबत असणारे आशिष ऊर्फ सनी शिंदे व करण फसले यांना बंटी राऊत म्हणाला की, मला चाकु दे रे, याला संपवुन टाकतो असे म्हणाला असता करण फसले याने त्याचे कमरेला असलेला चाकु काढला व बंटी राऊत यांचे हातात दिला. तेव्हा बंटी राऊत याचे सोबत असलेल्या साथीदारांना म्हणाला की, यांचे हात पकडा आज यांचा गळा चिरतो असे म्हणुन जिवे ठार मारण्याचे उददेशाने बंटी राऊत याने त्यांचे हातातील धारदार चाकुने विशाल याच्या गळ्यावर जोरात मारत असताना त्याने त्याचा डावा हात मध्ये टाकला असता त्याच्या हाताला लागुन दुखापत झाली. व त्याचवेळी त्याने विशाल याच्या डोक्याचे पाठीमागे, डावे कानाजवळ मारुन दुखापत केली. त्यावेळी विशाल जीव वाचवत असताना झालेल्या झटापटीत एक वार बंटी राऊत कडून करण फसले यांचे उजवे हातावर लागला, त्याचा फायदा घेत विशाल याने त्याची सुटका करून घेतली. त्यावेळी करण फसले, उमेश निस्ताने, रजत कडव, सचित देसले, अर्थव दिघे, करण शादिजो, आशिष ऊर्फ सनी शिंदे यांनी त्याला गचांडुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. यावेळी विशाल जोरजोरात ओरडत असताना त्यावेळी रस्त्याने जात असलेले आशिष विजय शिंदे व सोनु शिंदे असे भांडण सोडवण्याकरिता धावून आले असता, त्यांना देखील सनी शिंदे व उमेश निस्ताने यांनी शिवीगाळ करुन तुम्ही येथुन निघुन जा नाहीतर तुमचा देखील काटा काढू अशी धमकी दिली. हा प्रकार पाहून रस्त्याने जाणारे येणारे तसेच त्या परीसरातील लोकांनी त्यांची दुकान बंद करुन लोक सैरावैरा पळु लागले. त्यावेळी बंटी राऊत व त्याचे सोबत त्यांचे मित्र असे तेथून मोटारसायकलवरुन पळुन गेले. त्यानंतर जखमी विशाल याने जिल्हा रुग्णालयात उपचार घेवून शनिवारी (दि.४) सकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरुन पोलिसांनी बंटी राउतसह आठ जणांना अटक केली आहे.

# कंपनी कार्यालयातून १५ लाख लंपास

**अहिल्यागर (प्रतिनिधी) –** एमआयडीसी येथील क्लासिक व्हील लिमिटेड कंपनीच्या स्टेशन रस्त्यावरील कार्यालयातून चोरट्याने कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी ठेवलेली १५.५५ लाखांची रोकड चोरून नेली. शनिवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास ही घटना समोर आली. चोरट्याने ऑफिसच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या खिडकीतून आत प्रवेश केल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले आहे. या प्रकरणी सुनिल शांतीलाल मुनोत (वय ६०, रा. हिरकेश बंगलो, प्लॉट नं. ४२ (अ), स्टेशनरोड, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील मुनोत हे क्लासिक व्हील लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. कंपनीचे ऑफीस त्यांच्या हिरकेश बंगल्यातच आहे. तेथूनही ते कंपनीचे व्यवस्थापकीय कामकाज, कर्मचाऱ्यांचे पगार करतात. शुक्रवारी (३ जानेवारी) त्यांनी नेहमीप्रमाणे सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ऑफीस बंद केले. शनिवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास ऑफीसच्या सफाई कामगाराला साफसफाई करत असताना ऑफीसमधील ड्रॉव्हर तोडल्याचे दिसले. तिने ऑफीसमधील कर्मचाऱ्याला याची माहिती देताच कर्मचाऱ्याने मुनोत यांना फोन करून माहिती दिली. मुनोत यांनी पाहणी केली असता ऑफीसमधील टेबलचे ३ ड्रॉव्हर तोडल्याचे व त्यात कर्मचाऱ्यांचे पगार करण्यासाठी ठेवलेली १५.५५ लाखांची रक्कम चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. अज्ञात चोरट्याने ऑफीसच्या पहिल्या मजल्यावरील खिडकीतून आत प्रवेश करून चोरी केल्याचे सीसीटीव्हीत दिसून आले.

त्यांनी कोतवाली पोलिसांना घटनेची माहिती देताच पथक घटनास्थळी दाखल झाले. चोरट्याने ऑफिसमध्ये प्रवेश केल्याचे सीसीटीव्हीत दिसून आल्याने पोलिसांनी फुटेज ताब्यात घेतले आहे. चोरट्याची ओळख पटवून त्याचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सांगितले.

# अपघातातील जखमी तरूणांचा उपचारादरम्यान मृत्यू

## पोलिस बनण्याचे स्वप्न राहिले अधुरे

**शेवगाव (शहर प्रतिनिधी) –** पांढरीपुल येथे चारचाकी आणि दुचाकी यांच्यात समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात जखमी झालेल्या शेवगाव तालुक्यातील ढोरजळगाव येथील दोन तरुणांचे उपचारादरम्यान २ जानेवारीला खासगी रुग्णालयात निधन झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. शुभम बबन लांडे (वय २५) व प्रशांत शेषराव देशमुख (वय २५) अशी मृत तरूणांची नावे आहेत.



ढोरजळगाव येथील शुभम लांडे आणि प्रशांत देशमुख हे ३१ डिसेंबरला अहिल्यानगरहून ढोरजळगावकडे परतत असताना सायंकाळी सहाच्या सुमारास पांढरी पुलाजवळ छत्रपती संभाजीनगरकडून येणारी मालवाहू चारचाकी आणि दुचाकी यांची समोरासमोर जोराची धडक झाली. यामध्ये दुचाकीचे चालक प्रशांत आधी वाहनावर व नंतर रस्त्यावर आदळले. त्यांच्या चेहऱ्याला आणि छातीला जबर मार लागला तर मागे बसलेला शुभम डांबरी रस्त्यावर आपटल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली अपघातानंतर तेथे उपस्थित असलेल्या ढोरजळगाव येथील रामेश्वर पाटेकर, प्रसाद खोसे व अन्य काही जणांनी जखमी दोघांना तात्काळ अहिल्यानगर येथील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले उपचारादरम्यान दोन दिवसानंतर २ जानेवारीला पहाटे प्रशांत यांचे तर सायंकाळी शुभम यांचे निधन झाले. मयत प्रशांत हा मेडिकल व्यावसायिक म्हणून कार्यरत होता तर शुभम पोलीस भरतीची तयारी करीत होता.

# वृक्षसंवर्धन काळाची गरज

## तहसिलदार माळी : साकत येथे वृक्षारोपण

**जामखेड (तालुका प्रतिनिधी) –** निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे. पुढील पिढीला सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षसंवर्धनाकडे घरातील मुलाप्रमाणे लक्ष दिले पाहिजे, असे जामखेडचे तहसिलदार गणेश माळी यांनी सांगितले. जामखेड तालुक्यातील साकत येथे स्मशानभुमी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. वनविभागाचे निवृत्त कर्मचारी रामभाऊ मुरूमकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी सहायक वनरक्षक गणेश मिसाळ, गटविकास अधिकारी शुभम जाधव, वनक्षेत्रपाल शेळके, तालुका कृषी अधिकारी रविंद्र घुले, विकास अधिकारी अशोक शेळके, माजी सभापती डॉ. भगवान मुरुमकर, प्रा. मधुकर राळेभात, कृषी सहायक समाधान सोनवणे, ग्रामसेवक राजेंद्र वळेकर, प्रमोद मुरुमकर, हनुमंत वराट, राजेंद्र मुरुमकर, महादेव वराट, अमोल मुरुमकर, प्रतिक मुरुमकर, दिलीप मुरूमकर, बाळासाहेब सानप, हरिभाऊ वराट, विनोद मुरुमकर आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन नागेश मुरुमकर यांनी केले. आभार दिनकर मुरुमकर यांनी मानले.

# मारहाणीतील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

## वरखेड येथील घटना; पोलिसांकडून दोण जणांना अटक

**शेवगाव (शहर प्रतिनिधी) –** तालुक्यातील वरखेड येथे पैशाच्या व्यवहारावरून झालेल्या मारहाणीच्या घटनेतील जखमी ट्रॅक्टर चालकाचा उपचारादरम्यान अहिल्यानगरच्या खासगी रुग्णालयात २ जानेवारीला मृत्यू झाला. भुजंग श्यामराव मडके (वय ४०) असे मयताचे नाव आहे. त्याच्यावर वरखेड (ता. शेवगाव) येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेतील दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी मयताची पत्नी योगिता भुजंग मडके (वय ३४) यांनी ३१ डिसेंबरला शेवगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, पती भुजंग हे २८ डिसेंबरला शेतामध्ये काम करीत होते.



त्यावेळी महेश दत्तात्रय तेलोरे याने भुजंग यांना दुपारी दोन वाजता पगाराचे पैसे घेण्यासाठी फोन करून गावामध्ये बोलावून घेतले. गावातील मंदिरासमोर भुजंग मडके महेश दत्तात्रय तेलोरे, दीपक महादेव तेलोरे, अमोल रावसाहेब उबाळे व इतर अज्ञात इसमांनी लाकडी काठीने पोटावर, छातीवर मारहाण करून जबर जखमी केले. गणेश रावसाहेब वंजारी यांनी भांडण सोडून पती भुजंग यांना घरी आणून सोडले. त्यानंतर त्यांना उलट्या होऊन त्रास झाल्याने शेवगाव येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दुसऱ्या दिवशी प्रकृती खालावल्याने त्यांना अहिल्यानगर येथे उपचारासाठी दाखल केले होते. त्यांच्यावर तेथे उपचार सुरू असताना सहाव्या दिवशी २ जानेवारीला पहाटे ४ च्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, भाऊ, एक मुलगी असा परिवार आहे. दरम्यान, या प्रकरणातील महेश व दीपक तेलोरे या दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, अमोल उबाळे व इतर आरोपी पसार झाले आहेत. पुढील तपास पोलिस निरीक्षक समाधान नागरे करीत आहे. पतीला जबर मारहाण केल्यानेच त्यांचा मृत्यू झाला असून, सर्व आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करावा, तसेच फरार आरोपींना त्वरित अटक करावी, अशी मागणी योगिता मडके यांनी पोलिसांकडे केली आहे.

# प्रा. शिंदेंच्या संघर्षाला सर्वोच्च फळ

## हजारे यांच्याकडून गौरव : सर्वपक्षीय सत्कार सोहळा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी) –** स्वतः चे चारित्र्य स्वच्छ ठेवून राजकारण व समाजकारणात काम करणारे प्रा. राम शिंदे यांच्या संघर्षाला विधान परिषद सभापतीपदाच्या रुपाने सर्वोच्च फळ मिळाले, असे गौरवोद्गार ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी शनिवारी येथे व्यक्त केले. सभापतीपदाच्या रुपाने भविष्यातही ते स्वच्छ काम करतील, अशी अपेक्षाही हजारे यांनी व्यक्त केली. सत्काराबद्दल प्रा. शिंदे यांनी कृतज्ञता व्यक्त करताना सभापतीपदाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची ग्वाही दिली.

सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सर्वपक्षीय सत्कार सोहळ्याचे आयोजन शनिवारी येथील माऊली सभागृहात करण्यात आले होते. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे व पद्मश्री पोपटराव पवार, विधान परिषदेचे आमदार सत्यजित तांबे व श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले, भाजप नेते प्रा. भानुदास बेरड, माजी आमदार दादा कळमकर व बाळासाहेब मुरकुटे, जिल्हा बँकेचे अंबादास पिसाळ, संचालक करण ससाणे, सचिन गुजर, बाबासाहेब दिघे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, ठाकरे सेनेचे शहर प्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसोंदर, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, शिंदे सेनेचे जिल्हा प्रमुख बाबू टायरवाले, भाजपचे शहर सरचिटणीस सचिन पारखी, बाळासाहेब हराळ आदी उपस्थित होते.



### सीना-साकळाई-कुकडीकडे लक्ष

- यावेळी बोलताना सभापती प्रा. शिंदे यांनी जिल्ह्यातील विकास कामांना गती देण्याची ग्वाही दिली. सीना नदी स्वच्छतेसाठी लवकरच बैठक घेऊन तेथे पद्मश्री पोपटराव पवारांना बोलावले जाईल. तसेच साकळाई पाणी योजना व कुकडीच्या पाच टीएमसी पाणी वाटपाबाबतही निर्णय घेऊ, असे त्यांनी सांगितले. आता बोलण्यापेक्षा कृती करू तसेच उत्तर व दक्षिण असा वाद न करता दक्षिणेतील वंचित भागात सुविधा निर्माण करण्यास प्राधान्य देऊ, असेही त्यांनी आवर्जून स्पष्ट केले.

### आपले दुकान वेगळे : तांबे

- कार्यक्रमाच्या सुरुवातीला काँग्रेसचे आ.ओगले यांनी कार्यक्रमाला काँग्रेसचे सर्व नेते आणि पदाधिकारी हजर असल्याची आठवण करून दिली. याचा संदर्भ देत आ. तांबे आपल्या भाषणात म्हणाले, मी तुमच्यात नाही. माझ दुकानच वेगळे आह, असे म्हणताच सभागृहात हशा झाला. यावेळी आ. तांबे यांनी जिल्हा परिषदेच्या सभागृहातील सहकारी सदस्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी बोलताना हजारे यांनी प्रा. शिंदे यांच्या संघर्षाचे कौतुक केले. विधान परिषदेच्या सभापतीपदाच्या माध्यमातून त्यांच्या संघर्षाला न्याय मिळाला व सर्वोच्च पद मिळाले आहे. असेच स्वच्छ काम त्यांनी सभापतीपदाच्या माध्यमातून करावे, ही अपेक्षा आहे व त्याला शुभेच्छाही आहेत, असेही हजारे यांनी आवर्जून सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी देशभरात पाण्यासाठी सामाजिक काम केले आहे. त्यांचा वारसा जपणाऱ्या प्रा. राम शिंदे यांना सर्वोच्च पद मिळाल्याने त्यांचा आगळावेगळा गौरव झाला आहे. या पदाच्या माध्यमातून प्रा. शिंदे यांनी सीना नदी स्वच्छ करण्याची मोहीम हाती घ्यावी, असे आवाहन करून पद्मश्री पवार यांनी केले.

शुगर लॉबीच्या व प्रस्थापितांच्या जिल्ह्यात मी अगदीच छोटा आहे. मी स्वप्नच बघू शकत नाही. पण संघर्ष करीत राहिलो, त्यामुळे सभापतीपदासारखे सर्वोच्च पद मला मिळाले, असे स्पष्ट करून सत्काराला उत्तर देताना प्रा. शिंदे म्हणाले, देवावर माझी श्रद्धा आहे व देवाभाऊवरही श्रद्धा आहे. धनगर समाजाचा मी पहिला व्यक्ती आहे की, जो विधान परिषदेच्या सभापतीपदी विराजमान झाला आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी प्रास्ताविक केले. ॲड. अभय आगरकर यांनी स्वागत केले व हिंदू राष्ट्र सेनेचे संजय आडोळे यांनी आभार मानले. यावेळी दादा कळमकर, फाळके, मुरकुटे, तांबे, ओगले यांची भाषणे झाली.

# श्रीगोंदा कांदा मार्केट पुन्हा सुरु

**श्रीगोंदा (प्रतिनिधी) –** श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवारात सुरू असलेले कांदा मार्केट बंद असल्याने शेतककऱ्यांना आपला कांदा खाजगी बाजार समिती, सोलापूर, कोल्हापूर, नगर, पुणे येथील मार्केट मध्ये विक्रीसाठी पाठवावा लागत होता. याबाबत दैनिक सार्वमतमध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर तीन दिवसापासून बंद असलेले कांदा मार्केट सुरू करण्यात आले. सरासरी प्रति क्विंटल तीन हजार तीनशे रुपये भाव कांद्याला मिळाला असल्याचे प्रभारी सचिव राजेंद्र लगड यांनी सांगितले.

कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा आवारात सुरु असलेले कांदा लिलाव मागील एक वर्षभरापासून बंद होते. सहकारी बाजार समिती असताना कधी प्रशासकीय कारणामुळे तर कधी व्यापाऱ्यांच्या एकाधिकारामुळे कांदा मार्केट बंद होते. शेतकऱ्यांना कांदा विक्रीसाठी बाहेर न्यावा लागत होता. याबाबत दैनिक सार्वमतमध्ये सहकारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील कांदा लिलाव सुरू करण्याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. यानंतर बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी व्यापाऱ्यांची बैठक घेत सूचना केल्या. हमाल मापाडी उपलब्ध करून दिल्यानंतर तीन दिवसांपासून कांदा लिलाव सुरु करण्यात आले आहेत. ०३ जानेवारीला व्हिआयपी वक्कल कांदा - ३४०० ते ३७०० रुपये (प्रति क्विंटल), एक नंबर - ३०००ते ३३०० रुपये, २ नंबर - २०००ते २९०० रुपये, ३ नंबर कांदा ५०० ते १९०० रुपये असा बाजार मिळाला. एकूण १ हजार क्विंटल कांद्याची आवक झाली.